सुरुवात करा...
नव्या समृद्ध जीवनाची
लखपती ठेव योजना
दरमहा रु.१,२५० भरा
६० महिन्याने रु.१,००,००० मिळवा
दरमहा रु.२,३५० भरा
३६ महिन्याने रु.१,००,००० मिळवा
इंद्रायणी मुख्य कार्या: भाळवणी बस स्टँड
शाखा: ढवळपुरी,गोरेगाव,सुपा,टाकळी ढोकेश्वर,अ.नगर
अधिक माहितीसाठी संपर्क : 9423059405 9763484973

# पारनेर दर्शन

भारत सरकार मान्यताप्राप्त,
हॉलमार्क प्रमाणित दागिण्यांचे दालन.
धरमचंद भवरीलाल™
सराफ अँण्ड ज्वेलर्स
मेन बाजार पेठ (आडत बाजार), बस स्टँड जवळ, नगर अर्बन को-ऑप.बँकशेजारी, घोडनदी, ता.शिरुर, जि.पुणे.
(02138) 22 45 45 w.w.w.facebook.com/dbjweller

वर्ष १ अंक १३९, शनिवार १० फेब्रुवारी २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# स्वातंत्र्यापासूनची मागणी आ. लंके यांनी केली पुर्ण!

■ ठोंबरे मळयात जाण्यासाठी गुळगुळीत रस्ता ■ नगरसेवक योगेश मते यांची माहिती

पारनेर : प्रतिनिधी

**पावसाळा आला की ठोंबरे मळयातून पारनेर शहरात यायचे कसे ? हा प्रश्न ठोंबरे मळयातील नागरीकांना दरवर्षी भेडसावत असे. अनेकांकडे रस्त्याची मागणी करूनही आश्वासनापलीकडे त्यांच्या पदरात काहीच पडले नाही. आ. नीलेश लंके यांच्याकडे या रस्त्यासाठी मागणी केल्यानंतर त्यांनी तात्काळ हा रस्ता करून देण्याचे मान्य केले. आज हा रस्ता पुर्ण झाला असून ठोंबरे मळयातील नागरीकांनी आ. लंके यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली आहे.**





लोणीहवेली रस्ता ते ठोंबरे मळा या सव्वा किलोमिटर अंतराच्या रस्त्यासाठी ३२ लाख रूपयांचा निधी मंजुर करण्यात आला होता. अलिकडेच या रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम पुर्ण झाले असून साईड पटयांचे काम लवकरच पुर्ण होणार आहे. गुळगुळीत रस्ता झाल्याने या रस्त्यावरील दळणवळण सुलभ झाले असून नागरीकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. याच प्रभागातील महाजन मळा रस्त्यासाठीही २५ लाख रूपयांचा निधी मंजुर करण्यात येऊन या रस्त्याचे कामही प्रगतीपथावर असल्याचे नगरसेवक योगेश मते यांनी सांगितले.

दरम्यान, यापूर्वी भाऊ शेटे ते बाळू शेटे मळा हा २६ लाख ५० हजार रूपये खर्चाचा रस्ता तसेच जामगांव रोड ते औटी वाडा रस्ता या ८ लाख ५० हजार रूपये खर्चाचा रस्ताही पुर्ण करण्यात आला आहे.



■ स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शहरातील ठोंबरे मळा प्रथमच डांबरी रस्त्याने जोडला गेला आहे.

## लवकरच तीन रस्त्यांचे भुमिपूजन

पारनेर ते लोणी ५ कोटी, सुभाष औटी घर ते लोणी शिव ४५ लाख अर्जुन ठुबे ते जामगांव रस्ता ५० लाख रूपये खर्चाच्या या तीन रस्त्यांचे आ. नीलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली, नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष व सहकारी नगरसेवकांच्या सहकार्याने येत्या पंधरा दिवसांत भुमीपूजन करण्यात येणार असल्याचे योगेश मते यांनी सांगितले.

## विकसित प्रभाग अशी ओळख निर्माण करणार

पारनेर शहरातील क्षेत्रफळाने तसेच लोकसंख्येने सर्वात मोठा प्रभाग असून विकासाच्या बाबतील सर्वात मागास प्रभाग अशी असलेली ओळख पुसून आपला कार्यकाळ संपेपर्यंत सर्वाधिक विकास कामे झालेला प्रभाग अशी ओळख निर्माण करण्याचा माझा मानस आहे.

**योगेश मते**
सभापती, पाणीपुरवठा समिती

## आ. लंकेंना साथ आणि विकासाला सुरूवात !

पारनेर नगरपंचायतीच्या सार्वत्रीक निवडणूकीचा निकाल जाहिर झाल्यानंतर त्रिशंकू अवस्था निर्माण झाली होती. आपण राष्ट्रवादी काँग्रेसच्या विचारांचे असल्याने विकासाच्या मुद्दावर राष्ट्रवादी काँग्रेसला पाठींबा देण्याचा विनाअट निर्णय घेतला. त्याच वेळी आ. लंके यांनी रस्त्यांची कामे मार्गी लावण्याचा शब्द दिला होता. त्यांनी तो शब्द पुर्ण करून इतर रस्त्यांनाही निधी दिला. कार्यकाळ संपेपर्यंत प्रभागातील सर्व रस्ते पुर्ण करण्याचे आपले ध्येय असल्याचे मते म्हणाले.

## पथदिव्यांची मागणी पुर्ण

प्रभागात मोठया प्रमाणावर पथदिव्यांची मागणी करण्यात येत होती. नगरपंचायतीच्या माध्यमातून ही मागणी पुर्ण करण्यात आली असून उर्वरीत पथदिवेही लवकरच बसविण्यात येणार असल्याचे मते यांनी सांगितले.

# नियतीने डाव साधला..
# बाळासोबत आईलाही नेले!

■ राळेगणसिध्दी येथील घटना ■ कंटेनरने चिरडल्याने मायलेक झाले होते जखमी

राळेगणसिध्दी : प्रतिनिधी

**कंटेनरने चिरडल्याने गेल्या आठवडयात गंभीर जखमी झालेले मायलेकांपैकी बाळाचा मृत्यू झाला. त्यानंतर मृत्यूशी झुंज देत असलेल्या आईचाही गुरूवारी मृत्यू झाला. नियतीने डाव साधत बाळासोबत आईलाही नेल्याने राळेगणसिध्दी परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.**



गेल्या आठवडयात नगर-पुणे महामार्गावर शिरूर बायपास येथे कंटेनरने चिरडल्याने आयांश सुहास गावडे वय २ वर्ष व तनुजा सुहास गावडे वय २३ वर्ष हे मायलेक गंभीर जखमी झाले होते. सुहास व तनुजा हे दोन वर्षांच्या आयांशसह दुचाकीवर राळेगणसिध्दीहून शिरूर येथे एका खाजगी रूग्णालयात गेले होते. शिरूर बायपासवरील रूग्णालयातून ते पुन्हा राळेगणसिध्दीकडे निघाले असता सुहास गावडे हे लघुशंकेसाठी रस्त्याच्या बाजूला दुचाकी उभी करून थांबले होते.

सुहास लघुशंकेसाठी गेले त्यावेळी दोन वर्षाचा आयांश दुचाकीच्या टाकीवर बसलेला होता तर तनुजा गावडे या दुचाकीजवळ उभ्या होत्या. त्याच वेळी पुण्याहून नगरकडे भरधाव वेगाने जाणा-या कंटेनरने दुचाकीस जोराची धडक दिली. त्यात आयांश हा डांबरी रस्त्यावर फेकला जाउन जखमी झाला तर तनुजा या कंटेनरखाली चिरडल्या गेल्या. अपघातानंतर कंटेनरचालक घटनास्थळावरून पसार झाला.

अपघात झाल्याचे लक्षात आल्यानंतर सुहास गावडे हे गांगारून गेले. आजूबाजूच्या नागरीकांनी जखमी आयांश व तनुजा यांना रूग्णालयात दाखल केले. मात्र दोघेही गंभीर जखमी झाल्याने रूग्णवाहिकेतून त्यांना पुणे येथील रूग्णालयात दाखल करण्यात आले. तिथे आयांश याचा मृत्यू झाला. उपचार सुरू असताना तनुजा यांचाही गुरूवारी मृत्यू झाला. या दुर्घटनेमुळे राळेगणसिध्दी परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# जयंत वाघ काँग्रेसचे नवे जिल्हाध्यक्ष

काळ संघर्षाचा पण भविष्य काँग्रेसचे : थोरात

संगमनेर : प्रतिनिधी

**अहमदनगर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी जयंत रामनाथ वाघ यांची नियुक्ती करण्यात आली. काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते आमदार बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. वाघ यांना शुभेच्छा देताना थोरात म्हणाले, काळ संघर्षाचा आहे मात्र भविष्य काँग्रेस पक्षाचे आहे, झोकून देऊन काम करा. आपण जिल्ह्यात काँग्रेस बळकटीने उभी करू.**



जयंत वाघ यांच्या नियुक्तीचा आदेश प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष नाना गावंडे यांच्या सहीने निर्गमित करण्यात आला. वाघ हे जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे विश्वस्त आहेत, यशवंतराव चव्हाण व्यासपीठचे उपाध्यक्ष, कबड्डी असिोएशनचे उपाध्यक्ष आदींसह विविध सामाजिक आणि राजकीय संघटनांवर ते सक्रिय सदस्य म्हणून कार्यरत आहेत. वाघ यांचे वडील रामनाथ वाघ हे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष होते. तसेच जिल्हा काँग्रेस कमिटीचे सात वर्षे अध्यक्ष राहिलेले आहेत.

आमदार थोरात म्हणाले, जयंत वाघ यांना पुरोगामी आणि वैचारिक परंपरा आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यात काँग्रेस नक्की सक्षमपणे काम करेल असा विश्वास आहे. यावेळी किरण काळे, प्रताप शेळके, संपतराव म्हस्के व काँग्रेस पदाधिकारी उपस्थित होते.

# प्रगतीत खोडा घालणारांना हटवा

■ दत्तात्रेय भुजबळ यांचे आवाहन ■ सैनिक बँक निवडणूक

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर तालुका सैनिक सहकारी बँकेची निवडणूक अंतिम टप्प्यात असून सभासदांनी बँकेच्या प्रगतीत खोडा घालणारांना हटवावे असे आवाहन परिवर्तन पॅनलचे उमेदवार दत्तात्रेय भुजबळ यांनी पत्रकारांशी बोलताना केले.**




माजी सैनिकांची अस्मिता असलेली पारनेर तालुका सैनिक बँक विद्यमान चेअरमनमुळे बदनाम झाली असल्याचे नमुद करून भुजबळ म्हणाले, गेल्या अनेक वर्षांपासून बँकेतील एकाधिकारशाहीला संपवून सैनिक सहकारी बँक वाचविणे गरजेचे आहे. सैनिक बँकेमध्ये ठाण मांडून बसलेल्या शिवाजी व्यवहारे यांना घरचा रस्ता दाखविणे गरजेचे आहे. जनतेच्या पैशांची लुट थांबविण्यासाठी परिवर्तन पॅनलला विजयी करण्याचे आवाहन भुजबळ यांनी केले.

त्याच त्याच व्यक्तींची एकाधिकारशाही संपविण्यासाठी, बँकेच्या उत्कर्षासाठी बँकेचे उज्वल भविष्य साकार करण्यासाठी निवडणूकीच्या माध्यमातून एक नामी संधी चालून आली आहे. बँकेचे संस्थापक अध्यक्ष ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या नेतृत्वाखाली सैनिकांच्या हितासाठी खऱ्या अर्थाने सैनिक सहकारी बँकेची स्थापना झाली. अण्णा हजारे हे माजी सैनिकांचे दैवत आहे. असे असताना शिवाजी व्यवहारे यांनी स्वतः चा स्वार्थ व हित जपणाऱ्या त्यांच्या भोवतालल्या इतर भ्रष्टाचार करणारांना सोबत घेत भ्रष्टाचार केल्याचा आरोप भुजबळ यांनी केला.

सैनिक बँकेच्या बरोबर मागील २८ वर्षापूर्वी ज्या बँका सुरू झाल्या त्या बँकांचा प्रगतीचा आलेख व सैनिक बँकेच्या प्रगतीचा आलेख पाहिला तर बँकेची प्रगती सध्याच्या संगणकाच्या युगात अतिशय संथ गतीने सुरू आहे. प्रगतीला गती देण्यासाठी परिवर्तन पॅनल निवडणूकीच्या रिंगणात उतरल्याचे भुजबळ म्हणाले.


# शिरुरला बर्निंग एसटीचा थरार!

■ पुणे- नगर रस्त्यावर बोऱ्हाडे मळ्यातील घटना
■ माल वाहतूक करणारी एसटी जळून खाक

शिरूर : प्रतिनिधी

**पुणे -नगर रस्त्यावरील बोऱ्हाडे मळ्यानजीक आज बर्निंग एसटी चा थरार पाहायला मिळाला.एसटी महामंडळाची माल वाहतूक करणारी कार्गो सेवेची ही एसटी बस या आगीत पूर्ण जळून खाक झाली. एसटीचा केवळ सांगाडा उरला. आज सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली.**

शॉर्ट सर्कीटमुळे एसटीला आग लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे. इंजिन मधून धूर येत असल्याचे लक्षात येताच ड्रायव्हरने लगबगीने गाडी रस्त्याच्या कडेला घेऊन बाहेर उडी मारली. त्यानंतर आग भडकत गेली मात्र या घटनेत कुठलीही जिवितहानी झाली नाही. आगीच्या ज्वाळा एवढ्या भयंकर होत्या की एक ते दोन किलोमीटरवरून आकाशात धुराचे काळे लोट दिसून येत होते. अपघातानंतर सुमारे दिड तास दोन्ही बाजूची वाहतूक थांबली होती. बघ्यांची प्रचंड गर्दी जमली होती.



शिरूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ज्योतीराम गुंजवटे उर्वरीत पान ३ वर

Hero जागा भरणे आहेत
▸ वर्कशॉप सुपरवायझर (ऑटो डीप्लोमा) : 2 जागा
▸ स्पेअरपार्ट एक्झीक्युटीव्ह (12 वी पास) : 1 जागा
▸ वॉशिंग बॉय (10 वी पास) : 2 जागा
▸ मेकॅनिक (आयटीआय) : 2 जागा
▸ सेल्स/गोडाऊन एक्झीक्युटीव्ह (ग्रॅज्युएट) : 2 जागा
▸ अकाउंट एक्झीक्युटीव्ह (बी.कॉम) : 2 जागा
▸ कम्प्युटर ऑपरेटर (कॉम्प्युटर कोर्स पास) : 2 जागा
▸ कॅशियर (बी.कॉम) : 2 जागा
▸ कॉलिंग एक्झीक्युटीव्ह (12 वी पास) : 2 जागा
दिग्विजय मोटर्स
ॲथोराईज्ड डीलर - हिरो मोटोकॉर्प लि.
9890335070 9028015644, 9028015641
भास्कर आयकॉन, पुणे-नगर बायपास रोड, विघ्नहर्ता हॉस्पिटल जवळ, बाबुराव नगर, शिरुर.

WALK-IN-INTERVIEW
SHREE BABANRAO NARAYAN DHOKALE SHIKSHAN V SANSHODHAN SANSTHA PUNE
ADARSH GROUP OF INSTITUTES
Khadakwadi, Tal. Parner, Dist. Ahmednagar,

| Sr.No. | Post | Subject | No. of Posts |
|---|---|---|---|
| 1 | M.Sc. Bed | Chemistry, | 2 Post each |
| | | Biology | 2 Post each |
| | | Mathematics | 2 Post each |
| 2 | M.A.Bed | English | 2 Post each |
| | | Geography | 2 Post each |
| | | Marathi | 2 Post each |
| | | SST | 2 Post each |
| 3 | B.Sc.Bed | Science | 2 Post each |
| | | Mathematics | 2 Post each |
| 4 | D.Ed. | English Medium | 2 Post each |
| | | Marathi Medium | 2 Post each |

Date & Time of interview: Monday, 12 th Feb 2024. 11:00 am. To 03.00 pm.
- Place of interview -
ADARSH GROUP OF INSTITUTES,
Khadakwadi, Tal. Parner, Dist. Ahmednagar, 414304.
Contact Details: 7887882535, E-mail.:director@shreebndhokaletrust.com
Secretary Chairman
Shree Babanrao Narayan Dhokale Shikshan V Sanshodhan Sanstha Pune
A/P.Khadakwadi, Tal.Parner, Dist.Ahmednagar

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2
डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ
● प्रसूती विभाग
प्रसूती पूर्व तपासणी
संपूर्ण प्रसूती उपचार
अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
● गर्भपिशवीचे आजार
अंगावरून पांढरे किंवा लाल जाणे
गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
● Infertility वंधत्व उपचार
वारंवार होणारे गर्भपात,
लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
● स्तनांचे आजार आणि उपचार
● PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
● सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया
सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)
पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

नोंदणी क्र. महा. ३९६/२२
जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST |
MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच
मेजर भगवान नांगरे सर
✻ आमची वैशिष्ट्ये ✻
✻ १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
✻ एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
✻ प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
✻ मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
✻ अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
✻ PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
✻ पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
✻ ॲडमिशन ओपन ✻
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# युवा

## मनाशी काही गोष्टी ठरवा!

**बऱ्याच घरांमध्ये लग्न झाल्या झाल्या एक वर्षात सासूशी भांडण आणि वाद होत असल्यामुळे वेगळं झाल्याची अनेक उदाहरणे आपल्याकडे पाहायला मिळतात, तर काही जणी समाजामध्ये काय बोलतील या भीतीने सासूचे टोमणे आणि त्रास सहन करत तशाच राहतात. पण तुम्हालाही लग्न झाल्यानंतर सासूबरोबर राहताना स्वतःला शांत ठेवायचे असेल तर तुम्ही लग्नाआधीपासूनच मनाशी काही गोष्टी नक्की करून घ्या. या टिप्स तुम्ही ठरवल्यात आणि त्याप्रमाणे तुम्ही वागलात तर नक्कीच तुम्हाला सासूमुळे घरात वाद झाले तरीही त्रास करून घेणे जरा कमी होईल...**



### स्वतःच्या बाजूने ठाम उभे राहा

तुमच्या आयुष्यात लग्न झाल्यानंतर अशी वेळ कितीतरी वेळा येऊ शकते जिथे तुम्हाला सासूला न विचारता काही निर्णय परस्पर घ्यावे लागतील. अशा स्थितीत तुम्ही सासूला घाबरून अथवा पुढे काय होईल याचा विचार करून गप्प बसू नका. तुम्ही अत्यंत सौम्यपणे परिणामांसह नक्की परिस्थिती काय होती हे ठामपणाने मांडायला शिका. उलटून न बोलता अत्यंत शांतपणाने व्यवस्थित सविस्तरपणे आपली बाजू मांडणे आणि स्वतःच्या बाजून ठामपणे उभे राहायला शिका. तुम्ही शांत राहिलात तर सासूलादेखील शांत राहणे भाग आहे. त्यामुळे नाहक होणारा वाद टळतो.

### नवऱ्याबरोबर वितुष्ट नको

आपली सासू आपल्याबरोबर कशी वागते हे तुमच्या नवऱ्याला माहीत असेलही वा नसलेही. पण तुम्ही जे काही घडलं आहे हे एकदा शांतपणे बसून त्यांना सांगणे गरजेचे आहे. पण तुमच्याशी जर तुमचा नवरा सहमत नसेल तर तुम्ही चिडचिड करू नका. ती त्याची आई असल्यामुळे तुमची प्रत्येक गोष्ट ऐकणं शक्य नाही. पण याचा अर्थ त्याच्यासह नात्यात वितुष्ट येईल असे वागू नका. कारण त्यामुळे तुम्हालाच अधिक त्रास होणार आहे हे लक्षात घ्या. पण असे जरी असेल तर नवऱ्याला त्याच्या आईची चूक लक्षात येईल हे चांगुलपणाने तुम्ही नक्कीच दाखवून देऊ शकता.



### हसून द्या योग्य उत्तर

काही सासू अशा असतात ज्यांना आपल्या सुनेच्या माहेरच्या लोकांबद्दल बोलायची खूपच खोड असते. असे ऐकल्यानंतर सुनेला राग येणे साहजिक आहे. पण तोंड वेडेवाकडे करून अथवा भांडून बोलण्यापेक्षा तुम्ही हसत हसतच त्या गोष्टीला उलट उत्तर कसं देता येईल हे शिकून घ्या. खेळकर वातावरण ठेऊनच तशीच उत्तरे द्यावीत आणि समोरच्याचे तोंड बंद करावे याची काळजी घ्या. तसंच तुम्हाला एखाद्या गोष्टीने मनाला वाईट असेल अथवा तुमच्या मागे तुमच्याबद्दल कोणालाही काही सांगण्यात येत असेल आणि तुम्हाला ते कळले तर सरळ एकदाच समोर जाऊन शांतपणे त्याबाबत सांगावे. या गोष्टी नमूद कराव्यात. पण तुमचे नाते घरात कसेही असेल तरीही दुनियेसमोर मात्र ते दाखवून देऊ नका. कोणत्याही कार्यक्रमात गेल्यानंतर सासूशी वाईट वर्तणूक करू नये. कारण तसे केल्यास, तुम्ही समजदार नाही असाच गैरसमज समाजात होतो. कोणत्याही घरात सासू आणि सुनेच्या वादाने अत्यंत गंभीर रूप घेतले तर तुम्ही घाबरून जाऊ नका. अन्याय सहन करणे हे चुकीचे आहे. तुम्हाला मानसिक अथवा शारीरिक त्रास होत असेल तर तुम्ही त्वरीत हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधून हिंसेविरुद्ध नक्की आवाज उठवा. यासाठी अनेकजण मदतीसाठी उपलब्ध असतात. त्यामध्ये सेंट्रल सोशल वेल्फेअर बोर्ड, पोलीस हेल्पलाईन, विविध एनजीओ यांचाही समावेश आहे.



## काही तरी जळतंय...

**खरंतर सोनिया आणि रचना यांची इतकी छान मैत्री, वास्तविक त्या दोघी जावा-जावा... पण तसं कुठेही जाणवायचं नाही. उलट त्यांच्यातली मैत्री अधिक जास्त अधोरेखित व्हायची. अलीकडे मात्र रचनाची खूप घालमेल व्हायची. सोनिया, तिची मुलं यांची होणारी प्रगती, आपल्या दिराची सुधारत जाणारी आर्थिक परिस्थिती आणि कुटुंबातलं त्यांचं वाढत जाणारं महत्त्व यामुळे आपल्याला वाईट का वाटतंय? खरं म्हणजे आनंद व्हायला हवा. आपलं आणि सोनियाचं किती पटतं. आपल्याला असं वाटणं ही जेलसी आहे का? नाही...नाही... मी इतकी संकुचित विचारांची थोडीच आहे? पण मग माझं मन असं का सांगतंय की तू जेलस फील करते आहेस आणि सगळ्या जगाला समजू शकणारी मी, माझ्या भावना नक्कीच ओळखू शकतेय. हो... ही जेलसीचं, ठाण मांडून बसलीय मनात. कसं काढू तिला बाहेर हा प्रश्न रचनाला सैरभैर करीत होता...**

जेलस वाटणं हे जितकं त्रासदायक तितकंच ते जाणवणं वेदना देणारं. स्त्रियांना या जेलसीला जास्त सामोरं जावं लागतं, याचा अर्थ पुरुषांना असूया वाटत नाही असं मुळीच नाही. पण, नात्यात जास्त गुंतते ती स्त्री. तिचा संबंध रिलेशनशिप सांभाळण्यात अधिक येतो. ती तिच्या कुटुंबाबाबत लव्हिंग आणि केअरिंग असते. त्यातूनच जेलसीचा संबंध तिच्याशी जोडला जातो. प्रतिष्ठा, नावलौकिक, मुलांचं शिक्षण, सौंदर्य, सवयी, संस्कार, नवऱ्याचं प्रेम, घरातलं स्थान, कुटुंबातलं महत्त्व यांसारख्या बऱ्याच गोष्टी जेलसीशी जोडल्या गेल्या आहेत. या गोष्टी मिळण्यात कमीअधिक असणारंच. मला मिळत नाही यापेक्षा दुसऱ्याला मिळतंय याची खंत, याचे दुःख आपल्याला जेव्हा दिसतं तेव्हा जेलसीची भावना स्पष्ट दिसायला लागते. आपल्या मनात अनेक भावनांचे तरंग उमटत असतात. त्यातल्या काही पॉझिटिव्ह तर काही निगेटिव्ह असतात. पण, जेलसीच्या भावनेला मिळालेलं रेप्युटेशन हे वाईट समजलं जातं. जेलसीमुळे माणसाची नाती विस्कटतात. रोमॅन्टिक रिलेशनशिपमध्ये ही जेलसी खूप जास्त महत्त्वाची भूमिका निभावते. आपल्यासाठी जे खूप मौल्यवान आणि महत्त्वाचे असते ते गमावून बसण्याच्या भीतीतून ही असूयेची भावना निर्माण होत असते. जेलसी ही एनव्ही (असूया) पेक्षा निराळी असते. ही भावना अशी असते की जी गोष्ट आपली नसते ती आपल्याला हवी असते. जेलसीतून निर्माण होतो ॲन्गर, रिसेन्टमेन्ट किंवा सॅडनेस जो तुम्हाला तुमच्या आणि स्वतःच्या गरजांबद्दल सांगत असतो. अशी ही जेलसी मनात आली तर कठीण परिस्थिती निर्माण होते म्हणूनच ही जेलसी येते तरी कुठून? हे माहीत करून घ्यायला हवं...

### जेलसी येते कुठून?

- जेव्हा तुमच्या मैत्रिणीला बॉयफ्रेंड असतो. ती रोमॅन्टिक डेटवर जाते आणि तुम्ही बिच्चारे, लूजर समजता स्वतःला. कारण तुम्ही अजून सिंगल असता किंवा नवरा असतो. पण तो महाबोअर असतो. हे रोमॅन्टिक डेट वगैरे शोभतं का, असं म्हटलं जातं पण मनातून जेलसी वाटत असते.
- तुमच्या को-वर्करला प्रमोशन मिळतं. खरंतर तुम्ही डिझर्व्ह करत असता. मग संताप होतो. जेलसी निर्माण होते असं काय आहे हिच्यात जे माझ्यात नाही हे वाटत राहतं. आपल्यात काय कमी आहे हे शोधणं आपण विसरूनच जातो.
- आपली जीवश्चकंठश्च मैत्रीण अचानक आपल्यापेक्षा नवीन मैत्रिणीबरोबर जास्त गप्पा मारते, फोनवर बोलते, तिच्याबरोबर जास्त वेळ घालवते. इथे इनसिक्युरिटीतून येते जेलसी. मैत्रिणीवरचा अधिकार कमी होतोय या जाणिवेने बेचैनी.



### जेलसीतून मुक्त होण्यासाठी...

- तुम्हाला वाटणाऱ्या जेलसीचे मूळ असुरक्षितता, भीती, एखादी पास्ट रिलेशनशिप पॅटर्नस कशात आहे ते पहिल्यांदा शोधा.
- संबंधित व्यक्तीशी बोला. कारण, हे बोलणं जेलसीतून बाहेर येण्यासाठी खूप उपयोगाचं ठरतं. तुमचा बॉयफ्रेंड किंवा नवरा, बॉस, जुनी मैत्रीण यांच्याशी स्पष्ट बोला. शंकेचे निरसन करा.
- तुम्ही त्या व्यक्तीबाबत कन्सर्न आहात हे जरूर सांगा. जर तुमच्या वागण्यातला बदल त्यांच्या लक्षात येत नसेल तर त्याची जाणीव द्या.
- एखाद्या विश्वासू मित्र- मैत्रिणीशी या वाटणाऱ्या जेलसीबद्दल बोला. कारण, अशा मनस्थितीत आपल्याला जो ॲन्गल दिसत नाही तो समोरच्याला दिसतो. जेलसीत वस्तुस्थिती दिसत नाही. डोळ्यांवर एक पडदा पडला असतो जणू.
- जेलसी ही एक गुंतागुंतीची आणि स्ट्राँग इमोशन आहे. या इमोशनशी डील करताना फार चांगलं फील होत नसतं. अशावेळी या निगेटिव्ह गोष्टीतून बाहेर पडण्यासाठी जी व्यक्ती आपल्याला योग्य माहिती देईल अशा व्यक्तीची मदत जरूर घ्यावी. कारण, आपल्याकडे काय आहे आणि आपल्याला काय हवंय यातला फरक म्हणजे जेलसी.
- जेलसी ही भावना काढण्यासाठी मेडिटेशन अर्थात प्राणायाम आणि निद्रा, शांत झोप खूप उपयोगी ठरते.
- काही वेळेला फेसबुक, इन्स्ट्राग्रामवर तुमच्या मैत्रिणी त्यांच्या फॅमिलीबरोबर, विशेषतः नवऱ्याबरोबरचे सुंदर-सुंदर फोटोज शेअर करतात. ते लोक ग्रेट लोकेशन्सला जाऊन किती एन्जॉय करताहेत हे तुम्ही पाहता आणि तुम्हाला वाटतं काय लकी आहेत, काय मस्त लाईफ आहे. नाहीतर आपलं आयुष्य या चूल आणि मूल, काटकसर करण्यातच जायचं. खरं म्हणजे बहुतेकवेळा ते निव्वळ फ्लान्ट करणं म्हणजे दिखाऊपणा असतो. तुम्हाला जे चित्र दिसतं तसं नसतं. सतत भांडणं, वाद, कटकटी, द्वेष पण सेल्फी, फोटोज काढताना मात्र प्रेमाचा खोटा मुखवटा धारण केलेला असतो आणि आपण त्यालाच खरं मानून जेलस होतो. म्हणून खरं, वास्तववादी चित्र काय आहे त्याचा भानावर राहून विचार करा.
- आपल्याजवळ जे आहे त्याबद्दल स्वतःचे कृतज्ञ रहा. ग्रॅटिट्यूडची छोटीशीच भावना तुम्हाला आयुष्यात खूप पुढे घेऊन जाते. त्यातून फक्त जेलसीची भावनाच कमी होते असं नाही, तर मनावरचा ताणही निवळतो. प्रत्येकालाच जे हवं ते या लाईफमध्ये नाही मिळत. पण, तुम्हाला जे हवंय त्यातलं काहीतरी नक्कीच मिळतं. अशाकाही गोष्टी ज्या तुम्ही एक्स्पेक्टही नसतील त्या सुद्धा मिळतात आपल्याला. आपल्याजवळ काय नाही यापेक्षा काय आहे याचा शोध तुमच्या मनातल्या जेलसीची तीव्रता निश्चित कमी करते.
- तुम्हाला कसली जेलसी वाटते ते लिहून काढा. काय फील होतं ते नोटडाऊन करा. जेलसी वाटते अशा जागेपासून लांब जा. स्वतःच्या गुणांवर लक्ष केंद्रित करा. स्वतःची किंमत करा. तुमचे व्हॅलिडेशन अर्थात व्हॅल्यू समजून घेतली की आत्मविश्वास वाढून जेलसीची भावना कमी होऊ शकेल. मला काय हवंय? दुसऱ्याच्या ताटात वाढलेलं की माझ्यात स्वतःत असलेलं या विचारातून तुमचा सेल्फ रिस्पेक्ट वाढेल. तुमची इनफिरिअरिटी किंवा कॉम्पीटिटीव्हनेसची भावना कमी होत जाईल.
- माइंडफुलनेसची टेकनिक्स जजमेंटल न बनता तुमच्या विचार आणि भावनांना तुम्हाला ओळखायला मदत करतील. की हो मला जेलसी वाटू शकते पण स्वतःला थोडा वेळ द्या. ती भावना तात्पुरती हवी. काही वेळाने ती निघून जायला हवी हे स्वतःला सांगा. शेवटी हेच लक्षात ठेवायला हवं की, A flower does not think of competing to the flower next to it. It just blooms.

## मित्र असावा अस्सा!

**आयुष्यात एक मित्र तरी असावाच लागतो जो आपल्याला कोणत्याही परिस्थितीतून बाहेर काढण्यासाठी कायम तत्पर असतो. हा मित्र तुमच्या प्रत्येकवेळी आजूबाजूला नसला तरी तुमच्या आयुष्यात आलबेल आहे की नाही याची खबर ठेवतो. तुम्ही चुकता तेव्हा तुम्हाला ओरडायलाही कमी करत नाही. तुम्ही काही चांगलं करत असाल तर तुमची तारीफ करूनही थकत नाही. मैत्रीच्या अनेक व्याख्या सगळ्यांनी केलेल्या असल्या तरी देखील सर्वसाधारणपणे केवळ फायदा न पाहता तुमच्याही निखळ प्रेम करणारी व्यक्ती ही तुमच्या आयुष्यातील बेस्ट मित्र असू शकते. तुमच्याही आयुष्यात असा एक मित्र असेल तर तुम्ही त्यांच्यासोबत असे मुळीच वागू नका की ज्यामुळे तुमची मैत्री दावणीला लागेल...**

### खोटं बोलू नका...

कोणत्याही नात्यात खोटं बोलून अजिबात चालत नाही. मैत्री दोघांची असो वा मोठ्या ग्रुपची. जर तुम्ही त्यातील एका सदस्याशी खोटं बोलत असाल तरी देखील मैत्रीवर त्याचा परिणाम होऊ लागतो. खूप जणांच्या गटामध्ये एकाशी आपली मैत्री अधिक असू शकते हे अजिबात नाकारता येत नाही. कारण हा सर्वसाधारणपणे मानवी स्वभाव आहे. तुमची ग्रुपमध्ये एकाशीच मैत्री आहे हे अजिबात दिसता कामा नये. मैत्री टिकवताना एकमेकांशी खोट बोलावं लागेल अशी परिस्थिती अजिबात निर्माण करु नका. त्यामुळेही खूप वेळा अडचणी निर्माण येतात. (उदा. एखादी व्यक्ती जर तुमच्यावर खूप विश्वास ठेवत असेल पण तुमच्या स्वतःच्या फायद्यासाठी जर तिच्याशी खोटं बोलत असाल तर ते अजिबात चांगले नाही.)





### मैत्रीचा फायदा घेऊ नका

मैत्रीत सगळं काही माफ असतं हे खरं असलं तरी देखील मैत्रीत अनेकदा एखादी व्यक्ती कारण नसताना दुसऱ्या मित्राचा किंवा मैत्रिणीचा फायदा घेतो. हा फायदा पैशांचा नाही तर मानसिक सुद्धा असू शकतो. एखाद्या व्यक्तीचा मानसिक फायदा घेणे हे नेहमी चुकीचे. एखादी व्यक्ती जर तुमच्यावर खूप जास्त विश्वास ठेवत असेल तर अशा तुमच्या मित्रांसोबत तुम्ही त्या मैत्रीचा फायदा चुकीच्या गोष्टींमध्ये घेऊ नका. तुमच्या जवळच्या मित्राला तुमच्या मनात चालणारी वाईट गोष्टसुद्धा माहीत असते. त्यामुळे असे करताना तुमच्या मित्राचे मन दुखावले जाणार नाही याची काळजी घ्या.

### चांगला आणि योग्य सल्ला द्या

प्रत्येक जण काही ना काही चुका आयुष्यात करतच असतं. कोणी चुकत नाही असे मुळीच होत नाही. कधीकधी इमोशनल होऊन चुकीच्या मार्गावर जाणारे लोकंही तुम्ही नक्कीच पाहिले असतील. तर तुमचा जवळचा मित्र त्याच्या आयुष्याशी निगडीत चुकीचा असा निर्णय घेऊ पाहात असेल तर त्याला योग्य निर्णय घेण्यासाठी जी मदत करता येईल ती करा. कारण कधी कधी चुकीच्या मार्गाने जाताना तुम्ही त्यांना योग्य मार्ग दाखवला तर तुम्ही त्याला योग्य सल्ला योग्य वेळी द्याल असे होईल. आता मित्र असणे गरजेचे नाही ती मैत्री जपणे जास्त गरजेचे आहे.

## 'डेटिंग ॲप'वरून प्रेम करताना...

**एखाद्याला प्रेम अगदी पटकन आणि सहज मिळते, तर काही जणांना असे प्रेम मिळायला खूप अडचण येते. मनासारखा आणि योग्य जोडीदार मिळणे खूप जणांना कठीण जाते. अशावेळी डेटिंग ॲपचा आधारही खूप जण घेताना दिसतात. पण याच डेटिंग ॲपवरून कधी कधी विश्वासघात किंवा त्याहून वाईट घटना घडल्याचा अनुभव अनेकांना आला आहे. त्यामुळे डेटिंग ॲपवरून कोणत्याही गोष्टी करताना काही चुका ज्या भावनेच्या भरात वाहत जाऊन होतात, त्यांना तुम्ही रोखू शकता...**



- माहिती काढा : एखाद्या व्यक्तीची ओळख अशा डेटिंग ॲपवरून झाल्यानंतर त्याची थोडी माहिती काढण्यास काहीच हरकत नाही. बरेचदा खोटे किंवा मॉर्फ केलेले फोटो लावून काही जण केवळ टाईमपास करण्यासाठी एखाद्या अकाऊंटवरून एखाद्या मुलीशी किंवा मुलाशी चॅट करू पाहतात. खोट्या फोटोंमुळे खूप जण एखाद्याच्या प्रेमात पडण्याची शक्यता असते. इथेच तुम्हाला भावनांना थोडासा आवर घालायचा असतो. कोणताही फोटो पाहून त्याच्याशी लगेच सगळं शेअर करण्याआधी त्या व्यक्तीची माहिती तुम्ही काढून घ्या. माहिती काढल्यानंतर सोशल मीडियावर या व्यक्तीला शोधणे त्याची माहिती काढणे सहज शक्य होते.
- वैयक्तिक गोष्ट शेअर करू नका : कोणत्याही डेटिंग ॲपवरील व्यक्तीशी बोलायला घेतल्यावर तुम्ही त्याच्यावर जोपर्यंत संपूर्ण विश्वास बसत नाही तोवर त्याला कोणतीही वैयक्तिक माहिती सांगू नका. अशा वैयक्तिक माहितीमध्ये घराचा पत्ता, कामाचे ठिकाण, जीमचे ठिकाण किंवा तुमच्या काही खासगी जागा अशी काही माहिती तुम्ही अजिबात सांगू नका. अशा वैयक्तिक गोष्टी शेअर केल्यामुळेही तुम्हाला नुकसान होऊ शकते. यागोष्टी व्यतिरिक्त तुमची आर्थिक परिस्थितीही न सांगिलेलीच बरी. कारण त्यामुळेही अनेकदा फसवणूक होते.
- पैशांचे व्यवहार करू नका : डेटिंग ॲप हा एखाद्या हनी ट्रॅपसारखा असतो. यामध्ये खूप वेळा गोड बोलून एखाद्याकडून काहीतरी काढून घेण्याचा एखाद्याचा मनसुबा असू शकतो. एखादी व्यक्ती आपलं मन जिंकून घेते. मन जिंकून घेतल्यानंतर हळूहळू आपल्या समस्या सांगू शकते. पैशांची अडचण सांगून तुमच्याकडून पैसे काढून घेतले जातात. हल्ली डेटिंग ॲपची हीच भीती आणि धोका सगळ्यात जास्त लोकांना अनुभवायला मिळाला आहे. त्यामुळे ही चुकी करायला अजिबात विसरू नका.



- भेटायला जाताना... : एखाद्याशी खूप वेळ बोलल्यानंतर आणि त्याला जाणून घेतल्यानंतर भेटण्याची ओढ कोणालाही वेडी करू शकते. पण तुम्ही ज्याच्याकडे प्रेमाच्या भावनेने किंवा पार्टनर म्हणून विचार करत असाल तरी देखील त्या व्यक्तीचे प्रेम मिळवण्यासाठी तुम्ही त्याला भेटायला जाताना त्याला कुठे भेटत आहात हे देखील माहीत करून घ्या. भेटण्याचे ठिकाण हे नेहमी गर्दीचे आणि तुम्हाला माहीत असलेले ठिकाण निवडा. म्हणजे जर तुम्हाला ती व्यक्ती समोरून पटली नाही तर तुम्हाला तेथून निघणे सोपे जाईल.

## शॉर्ट न्यूज

### अजान वृक्ष उद्यानसह गोशाळेचे उद्घाटन

■ **नेवासा :** येथील संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरात अजान वृक्ष उद्यान व गोशाळेचे उद्घाटन करण्यात आले. पत्रकार गुरुप्रसाद देशपांडे तसेच संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे अध्यक्ष पांडुरंग अभंग, विश्वस्त विश्वासराव गडाख, माधवराव दरंदले आदींच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी शिवाजीराव होन, कृष्णा पिसोटे, भिकाभाऊ जंगले, प्रा. अशोकराव ढगे, भगवान सोनवणे व वारकरी मंडळ उपस्थित होते. यापुढे लोकांना त्याठिकाणी पारायण करता येईल पसायदान म्हणता येईल यासाठी भाविकांची बसण्याची देखील सोय करण्यात आली आहे.

### ६. ६९ कोटी खर्चाच्या रस्ते कामांच्या निविदा

■ **कोपरगाव :** मतदारसंघातील दळणवळणाच्या दृष्टीने महत्वाच्या विविध रस्ते कामांच्या ६. ६९ कोटी रुपये खर्चाच्या निविदा प्रसिद्ध झाल्या, असे आ. काळे यांनी सांगितले. कोपरगाव मतदार संघातील रस्ते विकासाचा अनुशेष भरून काढताना आ. काळे यांनी रस्त्यांसाठी शेकडो कोटींचा निधी मिळवून देत मतदार संघातील रस्त्याचा विकास केला. सतत शासनाकडे पाठपुरावा करून मंजूर निधीतून कामांच्या निविदा प्रसिद्ध करून काम लवकर सुरु व्हावे, असा त्यांचा प्रयत्न असतो. यातून मतदार संघात रस्त्यांच्या ६. ६९ कोटीच्या कामाच्या निविदा प्रसिद्ध झाल्या.

### बोधेगावात भरदिवसा घरफोडी

■ **शेवगाव :** तालुक्यातील बोधेगावमधील पैठण-पंढरपूर पालखी मार्गालगत असलेल्या बाळासाहेब सावळकर यांच्या घरातील कपाटाचे दुपारी लॉक तोडून त्यातील सोने-चांदी आणि रोख रक्कम असा दोन लाखांचा ऐवज चोरट्यांनी भरदिवसा लंपास केला. या घटनेची माहिती समजताच बोधेगाव पोलिस दुरक्षेत्राचे पोलिस कॉन्स्टेबल दिलीप राठोड, पोलिस नाईक सुखदेव धोत्रे यांनी घटनास्थळी भेट दिली.

### संगमनेरात रविवारी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन

■ **संगमनेर :** लायन्स क्लब संगमनेर सफायरच्या वतीने मालपाणी उद्योग समूहाचे उद्योजक स्व. माधवलाल मालपाणी यांच्या स्मृतिप्रित्यर्थ ११ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ वाजता भव्य मॅरेथॉन स्पर्धे चे आयोजन केल्याची माहिती लायन्स क्लब संगमनेर सफायरचे संस्थापक अध्यक्ष गिरिश मालपाणी यांनी आज दिली. या स्पर्धेत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी केले आहे.

### महिलांनी बचत गटातून आर्थिक प्रगती साधावी

■ **अकोले :** बचत गटांसह महिलांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम झाले पाहिजे. याचबरोबर बचत गटांतून तयार केलेले उत्पादने पर्यटनाच्या माध्यमातून विकली तर व्यवसाय वाढेल. जर व्यवसाय चांगल्याप्रकारे वाढला तर त्यातून नक्कीच आर्थिक प्रगती होईल, असे प्रतिपादन माजी जिल्हा परिषद सदस्या सुषमा दराडे यांनी केले. अकोले तालुक्यातील पेढेवाडी येथे दरवर्षीप्रमाणे माजी जिल्हा परिषद सदस्या सुषमा दराडे आणि बचत गटाच्या सहकार्याने हळदी-कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ग्रामसंघाचे उद्घाटन बीजमाता राहीबाई पोपेरे यांच्या हस्ते झाले.

# कॅरम व बॅडमिंटन स्पर्धेत जयहिंद उपविजेते




**नारायणगांव : प्रतिनिधी**

**कुरण येथील जयहिंद पॉलिटेक्निकमधील मुलींच्या संघाने कॅरम व बॅडमिंटनच्या विभागीय स्पर्धेत उपविजेतेपद पटकावले. इंटर इंजिनिअरींग डिप्लोमा स्टुडन्ट्स स्पोर्टस असोशिएशनच्या वतीने घेण्यात आलेल्या डी-१ झोन अंतर्गत कॅरम स्पर्धा आर. एम. डी. धारीवाल इन्स्टिटयुट ऑफ टेक्नोलॉजी, पुणे येथे आयोजित करण्यात आल्या होत्या.**

या स्पर्धेत पायल गवारी,रसिका हिंगे, श्रुती कुरकुटे, अनुष्का जुंदरे, साक्षी गायकवाड, अर्चना विश्वे यांच्या संघाने सहभाग घेतला व वैष्णवी भुमकर यांनी मार्गदर्शन केले. बॅडमिंटन स्पर्धा अजिंक्य डी. वाय. पाटील स्कूल ऑफ इंजीनियरिंग (पॉलिटेक्निक) पुणे येथे पार पडल्या. या स्पर्धेमध्ये य वैष्णवी नरवडे, वैष्णवी मुळे, रिया डोके, सिद्धी हांडे, अनुष्का बीडकर यांच्या संघाने उप विजेतेपद पटकाविले व कु. अनुजा मगर यांनी विद्यार्थ्यींनीना मार्गदर्शन केले.

या विजयाबद्दल विद्यार्थ्यींनीचे जयहिंद शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष जितेंद्र गुंजाळ, सचिव विजय गुंजाळ, खजिनदार धर्मेंद्र गुंजाळ संचालिका डॉ. शुभांगी गुंजाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. डी.एस.गल्हे व तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. एस. आर. पोखरकर यांनी अभिनंदन केले.

# वेटलिफ्टिंग व कुस्ती स्पर्धेत जयहिंद तंत्रनिकेतनचे यश

**नारायणगांव : प्रतिनिधी**

**इंटर इंजीनियरिंग डिप्लोमा स्टुडन्ट स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने डी -१ झोन अंतर्गत भारोत्तोलन व कुस्तीच्या विभागीय स्पर्धा राजगड ज्ञानपीठ, भोर येथे पार पडल्या. या स्पर्धेत जयहिंद पॉलीटेक्निकचा खेळाडू ओम अजित मोरे याने ५६ किलो वजनी गटात भारोत्तोलन स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविले.**




कुणाल दत्तात्रय चासकर याने ९४ किलो वजनी गटात रौप्यपदक तर वेदांत थोरात याने कुस्तीमध्ये ६५ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले.या विजयाबद्दल विद्यार्थ्यांचे जयहिंद शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष जितेंद्र गुंजाळ, सचिव विजय गुंजाळ, खजिनदार धर्मेंद्र गुंजाळ संचालिका डॉ. शुभांगी गुंजाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. डी.एस.गल्हे व तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. एस. आर. पोखरकर यांनी अभिनंदन केले व राज्यस्तरीय स्पर्धेस शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी प्रा. अमेय शिंदे, श्री. हर्षल रणपिसे यांनी मार्गदर्शन केले.

# जास्तीत जास्त नागरिकांनी अभय योजनेचा लाभ घ्यावा

**नगर : प्रतिनिधी**



**नोंदणी आणि मुद्रांक शुल्क विभागाकडून सुरू असलेल्या अभय योजनेच्या पहिल्या टप्प्यातील कालावधीला नागरिकांच्या मागणीनुसार मुदतवाढ दिली आहे. यामुळे या योजनेचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले आहे.**

अभय योजनेच्या पहिल्या टप्प्यात जानेवारी अखेरपर्यंत ३४ हजार ४२७ नागरिकांनी योजनेचा फायदा घेतला. यात निष्पादित दस्तावरील १ लाखापर्यंत मुद्रांक शुल्क अथवा दंड असलेल्या १० हजार २५ प्रकरणांमध्ये शासनाने १०० % शुल्क माफी दिली. त्यानुसार शासनाने १२ कोटी २७ लाख ५९ हजार ६८५५ रुपयांचे शुल्क माफ करून नागरिकांना मोठा दिलासा दिला, तर शासनाला ८१ कोटी ७८ लाख ६३ हजार ६३९ रुपयांचा महसूल मिळाल्याचे महसूलमंत्री श्री.विखे पाटील यांनी सांगितले.


राज्यातील सन १९८० पासून २००० पर्यंत रखडेल्या मुद्रांक शुल्काच्या वसूलीत नागरिकांना दिलासा देण्यासाठी शासनाकडून दोन टप्प्यात अभय योजना राबविण्यात येत आहे. या योजनेत सन २००० पुर्वीच्या प्रकरणात दंडात १०० टक्के सवलत आणि मुद्रांकांत सवलत दिली जात आहे. एक लाखाच्या आतील मुद्रांक फरक असल्यास आणि ही प्रकरणे सन १९८० ते २००० या कालावधीतील असल्यास मुद्रांक शुल्कात ८० टक्के आणि त्यावरील दंडात १०० टक्के सवलत दिली आहे. एक लाखापेक्षा जास्त मुद्रांक असल्यास ५० टक्के रक्कम आणि दंड पूर्ण माफ करण्यास मुभा दिली आहे. सन २००० नंतरच्या प्रकरणांत २५ लाखांपेक्षा जास्त मुद्रांक असल्यास दंड ९० टक्के माफ होणार आहे, तर २५ लाखांपेक्षा जास्त मुद्रांक शुल्क असल्यास त्यामध्ये २५ टक्के माफी आणि दंड पूर्ण माफ केला जाणार आहे. जिल्हा मुद्रांक कार्यालय किंवा जिल्हाधिकारी कार्यालयांमार्फत ही योजना राबवली जात आहे.

या योजनाचा पहिला टप्पा १ डिसेंबर २०२३ ते ३१ जानेवारी २०२४ या कालावधीत राबविण्यात आला होता. पण नागरिकांच्या मागणीमुळे महसूल मंत्री विखे पाटील यांनी या टप्प्यातील कालावधी वाढविण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार शासनाने पहिल्या टप्प्याचा कालावधी वाढवून २९ फेब्रुवारी पर्यंत केला आहे. या योजनेचा दुसरा टप्पा १ मार्च ते ३१ मार्च पर्यंत राबविला जाणार आहे. सदरची योजना ही ठराविक काळासाठी असल्याने अधिकाधिक नागरिकांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन महसूल मंत्री श्री.विखे पाटील यांनी केले आहे.

**विभाग निहाय प्रकरणांची माहिती**
**मुंबई विभाग - १८,४८०**
**ठाणे विभाग - ६८,१०**
**पुणे विभाग - ४२७६**
**नाशिक विभाग- १५५३**
**नागपूर विभाग - १२०७**
**छ. संभाजी नगर - १०५२**
**अमरावती विभाग- ५०१**
**लातूर विभाग - ४६८**

# कष्टकरी महिलेला लकी ड्रॉमध्ये मिळाली लाखाची गाडी!

### संवेदना फाऊंडेशन व नगरसेविका अश्विनी जाधव यांच्या तर्फे हळदीकुंकू कार्यक्रम




**नगर: प्रतिनिधी**

**हॉटेलमध्ये भांडे घासण्याचे काम करणाऱ्या अनिता परमेश्वरी या महिलेला १ लाख रुपयाची एसेस टू व्हिलर गाडी लकी ड्रॉ मध्ये लागली व त्यांचा आनंद गगनात मावेना त्या इतकया भावुक झाल्या त्यांनी ड्रॉ मध्ये चिठ्ठीकाढणाऱ्या अभिनेत्री व जाधव दांपत्याच्या पाया पडल्या व माईकवर स्वतः अडाणी व भांडे घासण्याचे काम करतात असे सांगितले यावेळी उपस्थित शेकडो महिलांनी टाळ्यांचा कडकडाट केला.**

निमित्त होते संवेदना फाउंडेशन व नगरसेविका सौ. अश्विनी सचिन जाधव यांच्या वतीने नगर मधील दाळ मंडई येथे महिलांसाठी हळदी कुंकू समारंभ, विविध स्पर्धा व लकी ड्रॉ च्या बक्षीस वितरण समारंभ सिने अभिनेत्री तेजश्री प्रधान यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी माजी महापौर शिलाताई शिंदे, फुलपाखरू या मालिकेच्या निर्मात्या सुवर्णा सांगळे, उद्योजक राजेंद्र शिंदे, अॅड. संतोष गायकवाड, माजी नगरसेवक सचिन जाधव व संवेदना फाउंडेशनचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

अभिनेत्री तेजश्री प्रधान म्हणाल्या,नगरसेविका सौ. अश्विनी सचिन जाधव व सचिन जाधव यांचे सामाजिक कार्य अत्यंत चांगले व दखल पात्र आहे. या दांपत्याने आपल्या भागातील जनतेची सेवा करून विश्वास संपादन केला आहे. त्यामुळे त्यांचे भविष्य उज्वल आहे.मी महाराष्ट्रात अनेक ठिकाणी कार्यक्रमाला गेले मात्र हळदी कुंकवाच्या कार्यक्रमासाठी महिलांची एवढी मोठी लक्षणीय उपस्थिती मी प्रथमच अनुभवली. यावेळी खा.सुजय विखे व धनश्री विखे यांनी दिल्लीवरून व्हिडिओ कॉलद्वारे या कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या.

# राज्यातील प्राथमिक शाळांची वेळ बदलणार

### राज्य सरकारने काढला जी.आर

**मुंबई : प्रतिनिधी**

**राज्यातील चौथीपर्यंतच्या शाळा सकाळी ९ वाजता नंतर भरवा, असा जीआर महाराष्ट्र सरकारने काढला आहे. राज्य सरकारने सर्व शाळांना सूचना दिल्या आहेत. मुलांच्या मानसिक स्वास्थासाठी सरकारने हा निर्यण घेतला आहे.**



काही दिवसांपूर्वी एका भाषणात राज्यपालांनी शाळेच्या वेळा बदलण्याच्या सूचना दिल्या होत्या. शालेय शिक्षण मंत्र्यांनी याबाबत विचार सुरू असल्याचे सांगितले होते. दरम्यान सरकारने आता निर्णय घेतला आहे.
आधी प्राथमिक शाळा सकाळी सात वाजता सुरु व्हायच्या. यामुळे विद्यार्थ्यांची झोप होत नव्हती. याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या स्वास्थावर होत होता. त्यामुळे सरकारने आता शासन निर्णय काढला आहे. राज्य सरकारच्या निर्णयाची अंमलबजावणी राज्यात सुरू असलेल्या ६५ हजारांहून अधिक सरकारी शाळांमध्ये होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रात सरकारी, अनुदानित, विनाअनुदानित आणि खाजगी अशा एकूण १,१०,११४ शाळा आहेत.
राज्यपाल रमेश बैस काय म्हणाले होते?
"अलीकडच्या काळात प्रत्येकाची झोपण्याची पद्धत बदलली आहे. मुले मध्यरात्रीनंतरही जागे राहतात पण शाळेसाठी लवकर उठावे लागते. यामुळे त्यांना पुरेशी झोप मिळत नाही. या पार्श्वभूमीवर, राज्य सरकारने शाळेच्या वेळा बदलण्याचा विचार केला पाहिजे," असे बैस यांनी ५ डिसेंबर रोजी एका मेळाव्याला संबोधित करताना सांगितले.
शासनाच्या जीआरमध्ये काय म्हटलं?
राज्यातील सर्व माध्यमाच्या सर्व व्यवस्थापनांच्या शाळांपैकी काही शाळा विशेषतः खाजगी शाळा भरण्याच्या वेळा या साधारणपणे सकाळी ७ नंतर असल्याचे दिसून येते.
आधुनिक युगातील बदलेली जीवनशैली, मनोरंजनाची विविध साधने, शहरातील उशिरापर्यंत सुरु असलेल्या ध्वनिप्रदूषण उदा. वाहनांचा आवाज, विविध कार्यक्रमांच्या अनुषंगाने वाजविले जाणारे कर्कश संगीत इ. अशा अनेकविध कारणांमुळे विद्यार्थी रात्री उशिराने झोपत आहेत व सकाळी लवकर शाळा असल्याने त्यांची झोप पूर्ण होत नाही. ज्याचा नकारात्मक परिणाम विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर होताना दिसत आहे.
पालकांच्या मते पाल्याची झोप ही सकाळी पूर्ण न झाल्याने शाळेत जाण्यास लवकर उठण्यासाठी तयार नसतात.
सकाळी लवकर शाळा असल्याने विद्यार्थ्यांची रात्रीची झोप पूर्ण होत नसल्याने ते दिवसभर आळसलेले दिसून येतात. त्यामुळे बऱ्याचदा अध्ययनासाठी आवश्यक असणारा उत्साह कमी असलेला दिसून येतो. ज्याचा नकारात्मक परिणाम त्यांच्या अध्ययनावर होतो.
मोसमी हवामान, विशेषता हिवाळा व पावसाळा या ऋतू मध्ये सकाळी लवकर उठून शाळेत जाणे, पावसामुळे व थंडी मुळे अनेक विद्यार्थ्यांना त्रास होतो. ते बहुदा आजारी पडतात.
सकाळी पाल्याला लवकर तयार करणे, जेवणाचा डबा तयार करणे आणि पाल्याला वेळेत शाळेत सोडणे यामुळे देखील अनेक पालकांची ओढाताण होते,
सकाळी लवकर भरणाऱ्या शाळेतील विद्यार्थ्यांना बस व व्हॅन द्वारे नेताना रस्त्यावरील धुके, पाऊस यामुळेही अडचणी निर्माण होतात.
यानुसार शाळेच्या वेळेत बदल करताना शहरातील शासकीय व निमशासकीय कार्यालयाच्या वेळा व शाळांच्या वेळा समांतर येणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे, अन्यथा शहरी भागात वाहतुकीच्या मोठ्या समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे.
यानुसार शाळांच्या वेळेत बदल करताना दोन सत्रामध्ये भरणाऱ्या शाळांनी नियोजन करताना किमान प्राथमिक स्तरावरील विद्याथ्यर्थ्यांसाठी दुसऱ्या सत्राचा विचार करावा.

# नरसिंह राव, चौधरी चरण सिंह आणि एम.एस. स्वामीनाथन यांना भारतरत्न जाहीर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

**काँग्रेसचे नेते, देशाचे माजी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार जाहीर केल्याची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज (शुक्रवारी) एक्स अकाऊंटवरून केली. त्यांच्यासह माजी पंतप्रधान चौधरी चरण सिंह आणि कृषी क्षेत्रात क्रांती घडविणारे डॉ. एम.एस. स्मामीनाथन यांनाही भारतरत्न पुरस्कार जाहीर केल्याची घोषणा पंतप्रधान मोदी यांनी केली.**




एक्स अकाऊंटवर पंतप्रधान मोदी यांनी तीन पोस्ट टाकून या तीनही नेत्यांच्या नावांची घोषणा केली. माजी पंतप्रधान नरसिंह राव यांच्याबद्दल भावना व्यक्त करताना ते म्हणाले, माजी पंतप्रधान नरसिंह राव यांना भारतरत्न पुरस्काराची घोषणा करताना मला आनंद वाटत आहे.

**आर्थिक विकासाचे द्वार उघडणारे पी. व्ही. नरसिंह राव**

"एक प्रतिष्ठित विद्वान राजकारणी पी. व्ही. नरसिंह राव यांनी भारताच्या विकासात महत्त्वाचे योगदान दिले. त्यांनी आंध्र प्रदेशचे (एकत्रित) मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री आणि अनेक वर्ष संसद आणि विधानसभेचे सदस्य म्हणून काम केले. त्यांच्या दूरदरशी नेतृत्वामुळे भारत आर्थिक आघाडीवर पुढे आला. देशाला समृद्धी आणि विकासाच्या मार्गावर नेण्यात त्यांनी मोलाची कामगिरी बजावली", असे गौरवोद्गार पंतप्रधान मोदी यांनी काढले.

पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले, "पंतप्रधान या नात्याने नरसिंह राव यांचा कार्यकाळ देशासाठी महत्त्वाचा मानला जातो. त्यांनी जागतिक बाजारपेठेसाठी भारताचे द्वार उघडले. ज्यामुळे आर्थिक विकासाचे एक नवे युग सुरू झाले. याशिवाय परराष्ट्र धोरण, भाषा आणि शिक्षण क्षेत्रात त्यांनी दिलेल्या योगदानामुळे भारताला पुढे नेले, तसेच सांस्कृतिक आणि बौद्धिक पातळीवरही समृद्ध केले."

**आणीबाणीच्या विरोधात चौधरी चरण सिंह लढले**

माजी पंतप्रधान चौधरी चरण सिंह यांच्याबद्दल माहिती देताना पंतप्रधान मोदी म्हणाले, "चौधरी चरण सिंह यांनी दिलेल्या अतुलनीय योगदानाला हा पुरस्कार समर्पित करत आहोत. त्यांनी शेतकऱ्यांचे अधिकार आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी आपले पूर्ण आयुष्य वेचले. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री असो किंवा देशाचे गृहमंत्री किंवा साधे आमदार असतानाही त्यांनी केवळ राष्ट्र निर्माणाला महत्त्व दिले. आणीबाणीच्या विरोधातही त्यांनी ठाम भूमिका घेतली होती. आमच्या शेतकरी बांधवांसाठी त्यांची समर्पण वृत्ती आणि आणीबाणीच्या काळात त्यांनी लोकशाही वाचविण्यासाठी दाखविलेली तत्परता आम्हाला कायम प्रेरणा देत राहिल."

**कृषी क्षेत्रात आधुनिकता आणणारे एम. एस. स्वामीनाथन**

हरित क्रांतीचे जनक आणि ज्येष्ठ वैज्ञानिक डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांनाही भारतरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. त्यांच्याबद्दल भावना व्यक्त करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, "कृषी आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी झटणाऱ्या डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानीत करत असताना मनस्वी आनंद वाटत आहे. अतिशय आव्हानात्मक काळात स्वामीनाथन यांनी भारतीय कृषी क्षेत्राला आत्मनिर्भर बनविण्यात मोलाची भूमिका वठवली. तसेच भारतीय कृषी क्षेत्राला आधुनिकतेकडे नेण्यात महत्त्वाचा वाटा उचलला."

पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले, डॉ. स्वामीनाथन यांच्या दूरदृष्टीमुळे भारतीय कृषी क्षेत्राचा कायापालट तर झालाच पण त्याशिवाय देशाची अन्नाची गरज भागविली गेली आणि शेतीला समृद्धीही मिळाली. मी त्यांना अतिशय जवळून ओळखत होतो. मी नेहमीच त्यांचे सल्ले, सूचना यांना महत्त्व दिले.

(पान १ वरून)

### शिरुरला बर्निंग एसटीचा थरार!

व त्यांचे सहकारी घटनास्थळी पोहोचल्यानंतर एका बाजूने वाहतूक सुरळीत करण्यात आली. रांजणगाव एमआयडीसीतील अग्निशामक दलाची गाडी पोहोचल्यानंतर आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न झाला. मात्र तत्पूर्वीच संपूर्ण एसटी मालासह जळून खाक झाली होती. घटनास्थळी केवळ एसटीचा सांगाडा दिसत होता. शिरूर बस स्थानकातील अधिकाऱ्यांनीही घटनास्थळी धाव घेत आग विझविण्याचा प्रयत्न केला. स्थानिक कार्यकर्त्यांनी ही त्यांना मदत केली मात्र सर्वांचे प्रयत्न व्यर्थ ठरले.

# डेलनेट अनेक वाचकांशी जोडलेले नेटवर्क

## ■ रोहिदास राठोड यांचे प्रतिपादन ■ पारनेर महाविद्यालयात कार्यशाळा संपन्न



■ पारनेर महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेमध्ये रोहिदास राठोड यांनी मार्गदर्शन केले.

**पारनेर : प्रतिनिधी**

**कुठलेही संदर्भ तात्काळ हवे असल्यास ते पुरविण्याचे काम डेलनेट करीत असून डेलनेट हे इंटर लायब्ररी लोन सुविधा पुरविते व ते केवळ ग्रंथालयाशी जोडलेले नाही तर अनेक वाचकांशी जोडलेले नेटवर्क असल्याचे प्रतिपादन डेलनेटचे महाराष्ट्र व गोवा विभागाचे नेटवर्क असिस्टंट रोहिदास राठोड यांनी केले.**

पारनेर येथील न्यू आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज येथे महाविद्यालयाच्या ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

यावेळी बोलताना राठोड यांनी महाविद्यालयातील संशोधक, शिक्षक व ग्रंथालयाच्या वाचकांना डेलनेट पुरवित असलेल्या विविध सेवा सुविधांची माहिती ऑनलाईन प्रात्यक्षिकांसह दिली. ते म्हणाले, या सुविधेवर आपण विविध स्वरूपातील माहितीचा उपयोग करून घेऊ शकतो.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर म्हणाले, महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाकडून राबविण्यात येत असलेले उपक्रम स्तुत्य आहेत. ग्रंथालयाकडून नेहमीच विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. ग्रंथालय प्रमुख डॉ. भाउसाहेब शेळके यांनी प्रास्ताविक केले. उपप्राचार्य डॉ. अनिल आठरे, अंतर्गत गुणवत्त हमी कक्षाचे समन्वयक डॉ. तुकाराम थोपटे, कार्यलयीन अधिक्षक सावकार काकडे, विविध विभागांचे प्रमुख, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. भाउसाहेब शेळके, नामदेव ठाणगे, ज्योती पतके, नंदीनी चव्हाण, विलास भापकर यांनी परिश्रम घेतले. सीमा रोकडे यांनी सुत्रसंचलन तर डॉ. तुकाराम थोपटे यांनी आभार मानले.

### साहित्याचा महासागर

**डेलनेट म्हणजे साहित्याचा महासागर असून तो सर्वांनी निश्चित उपयोगाचा स्त्रोत आहे. त्याचा प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी यांनी जास्तीत जास्त वापर करावा.**

**रोहिदास राठोड**

### ई लायब्ररीच्या सुविधांचा वापर करा

**अशा कार्यशाळेचे आयोजन वाचकांना माहिति शास्त्रातील वेगवेगळया संकल्पना ज्ञात होउन त्यांची त्या विषयाची वैचारिक पातळी वाढण्यास मदत होते. महाविद्यालयातील सर्वच घटकांनी या सुविधांचा लाभ घेण्यासाठी ग्रंथालयीन ई लायब्ररी पुरवीत असलेल्या सुविधांचा वापर करावा.**

**डॉ. लक्ष्मणराव मतकर, प्राचार्य**

# लठ्ठपणा वाढतोय ! विद्यार्थ्यांनो जीवनशैली बदला

## ■ डॉ. संदीप औटी यांचे आवाहन ■ मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानांतर्गत कार्यक्रम



■ बदलत्या जीवनशैलीचे मुलांवर होणारे परिणाम या विषयावर पारनेर पब्लिक स्कुलमध्ये आयोजित कार्यक्रमात डॉ. संदीप औटी यांनी मार्गदर्शन केले.

**पारनेर : प्रतिनिधी**

**बदलत्या जीवनशैलीमुळे मुलांमध्ये लठ्ठपणा वाढत असून विद्यार्थ्यांनी सध्याची जीवनशैली बदलून व्यायामाची कास धरण्याचे आवाहन पारनेर शहरातील औटी हॉस्पिटलचे डॉ. संदीप औटी यांनी केले.**

पारनेर पब्लिक स्कुल अॅण्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्य येथे मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या अभियानांतर्गत बदलत्या जीवनशैलीचे मुलांवर होणारे परिणाम या विषयावर मार्गदर्शन करणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात डॉ. संदीप औटी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी बोलताना डॉ. औटी म्हणाले, पूर्वीच्या काळात महिला लवकर उठून जात्यावर दळण दळीत, पुरूष विहिरीवर मोटा हाकत, मुले-मुली मैदानावर खेळत. त्यामुळे शरीरातील कॅलरीज योग्य प्रकारे खर्च होत असत. त्यांचा आहारही सात्विक व सकस असल्याने आरोग्यही निरोगी राहत असे.

यावेळी बोलताना डॉ. औटी पुढे म्हणाले, अलिकडच्या काळात प्रत्येक जण संगणक, मोबाईलच्या आहारी गेला आहे. आहारातही फास्ट फुट, मैद्याचे पदार्थ खाण्यात आनंद माणण्यात येत असल्याने शरीरातील चरबी वाढून लठ्ठपणा मोठया प्रमाणावर वाढत असून त्यातूनच मुलांमध्ये न्यूनगंडाची भावना वाढत चालली आहे. हे टाळण्यासाठी नियमीत व्यायाम करावा, आठवडयातील पाच दिवस नियमितपणे चालावे. असे सांगत चालाल तर वाचाल हा प्रतिबंधात्मक उपाय देखील डॉ. औटी यांनी यावेळी सांगितला.

या कार्यक्रमास संस्थेच्या अध्यक्षा सविता म्हस्के, दत्तात्रय काकडे, सचिन मोढवे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित हाते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन तसेच आभार दिपक जाधव यांनी मानले.

### सकस, सात्वीक आहारास प्राधान्य द्या

**भारतीय संस्कृती सोडून प्रत्येक जण पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण करू पाहत असून त्याचे दुष्परिणाम आरोग्यावर होत आहेत. सकस व सात्वीक आहारास प्राधान्य देउन आपले आरोग्य सुदृढ व निरोगी रहावे यासाठी प्रत्येकाने नियमितपणे व्यायाम करावा, मैदानावर खेळावे.**

**गिताराम म्हस्के, प्राचार्य, पारनेर पब्लिक स्कुल अॅण्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स**

# जातेगांवच्या भैरवनाथ देवस्थानात पितळी अश्व !

## गाडेकर परिवाराकडून १ लाख ११ हजारांची देणगी



■ पानोली येथील गाडेकर परिवाराच्या वतीने भैरवनाथ देवस्थानला पितळी अश्वासाठी १ लाख ११ हजार १११ रूपयांची देणगी दिली. (छाया : शरद रसाळ)

**सुपा : प्रतिनिधी**

**जातेगांव येथील श्री काळ भैरवनाथ देवस्थान येथे पितळी अश्व बसविण्यात येणार असून त्यासाठी पानोली येथील इंदुराव गाडेकर स्टॅण्डल प्रा. लि चे राजेंद्र रावसाहेब गाडेकर व त्यांच्या परिवाराकडून १ लाख ११ हजार १११ रूपयांची देणगी देण्यात आली.**

पितळी अश्वासाठी देगणी दिल्याबद्दल देवस्थान ट्रस्टच्या अध्यक्षा सुनिताताई विठ्ठल पोटघन यांनी राजेंद्र गाडेकर व पिंपळनेर येथील भाऊसाहेब लटांबळे यांचा सत्कार करीत कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी बोलताना राजेंद्र गाडेकर म्हणाले, डोंगरदऱ्यामध्ये वसलेलेले श्री भैरवनाथ देवस्थान हे जागृत देवस्थान असून राज्यातील लाखो भाविकांचे श्रध्दास्थान आहे. देवस्थान ट्रस्टच्या वतीने परिसरात विविध विकास कामे करण्यात आली असून अनेक कामे प्रगतीपथावर आहेत.

गाडेकर पुढे म्हणाले, हा परिसर निसर्गरम्य असल्याने त्याकडे पर्यटकही नेहमीच आकर्षीत होता. अलिकडेच मराठी सिनेअभिनेते मकरंद अनासपुरे यांनी देवस्थानला भेट देउन समाधान व्यक्त केले होते. अनेक दाते देवस्थासाठी आपल्या परीने काही ना काही देत असतात. त्याच प्रमाणे आमच्या गाडेकर परिवाराकडून हा छोटासा प्रयत्न असल्याचे राजेंद्र गाडेकर यांनी नमुद केले. ट्रस्टच्या अध्यक्षा सुनिता पोटघन यांनी सध्या सुरू असलेल्या विकास कामांची यावेळी माहिती दिली.

यावेळी माजी सरपंच विठ्ठल पोटघन, व्यवस्थापक विजय गायकवाड, पुजारी प्रकाश गुंजाळ, सामाजिक कार्यकर्ते दत्ता शेलार, सचिन गायकवाड आदी उपस्थित होते. लेखापरिक्षक डी.एन. गायकवाड यांनी गाडेकर परिवारासह उपस्थितांचे आभार मानले.

# माळकूप कारखाना शेतकऱ्यांसाठी जीवनदायिनी

## ■ सुजित झावरे पाटील यांचे प्रतिपादन ■ कारखान्याच्या साखर पोत्यांचे पूजन

**भाळवणी : प्रतिनिधी**

**तालुक्याच्या उत्तर भागातील ढवळपुरी सारख्या अतिदुर्गम व दुष्काळी पट्ट्यामध्ये माळकूप याठिकाणी कृषीनाथ ग्रीन एनर्जी लिमिटेड साखर कारखान्याच्या संस्थापकांनी कारखाना स्थापन करण्याचे खऱ्या अर्थाने मोठे धाडस दाखवले त्यामुळे तालुक्याच्या उत्तर भागातील शेतकऱ्यांना हा कारखाना जीवनदायिनी ठरणार आहे. हा कारखाना ढवळपुरी सारख्या भागात सुरू झाल्यामुळे स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे त्यामुळे बेरोजगारीचा प्रश्नही बऱ्यापैकी मिटला आहे असे मत अहमदनगर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजितराव झावरे पाटील यांनी व्यक्त केले**

माळकुप येथील साखर कारखान्याच्या एक लाख ४१ हजार एक साखर पोत्याचे पूजन अहमदनगर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजितराव झावरे पाटील व पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अरुणराव ठाणगे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी कृषीनाथ ग्रीन एनर्जी लिमिटेड, माळकूप या साखर



कारखान्याचे संस्थापक चेअरमन महेश करपे, संचालक डॉ. पोपटराव मते ,माळकुप सेवा सोसायटीचे संचालक स्वप्निल राहिंज व साखर कारखान्याचा प्रशासकीय वर्ग तसेच कर्मचारी वर्ग आणि अधिकारी वर्ग यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होता.

यावेळी पारनेर बाजार समितीचे माजी सभापती अरुणराव ठाणगे म्हणाले की, खऱ्या अर्थाने साखर कारखाना स्थापन झाल्यामुळे या कारखान्याच्या माध्यमातून परिसरामध्ये नंदनवन निर्माण झाले आहे. कृषीनाथ ग्रीन एनर्जी लिमिटेड, माळकूप हा साखर कारखाना भविष्यात पारनेर तालुक्याच्या विकासाचा भाग बनेल. महेश करपे यांनी साखर कारखान्याच्या माध्यमातून पारनेर तालुक्यातील शेतकऱ्यांची हित जोपासावे असे ठाणगे यांनी यावेळी सांगितले.

# कै.अॅड.उदय शेळके यांच्या पुण्यस्मरणानिमित्त रविवारी कार्यक्रम

## पुजाविधी, प्रवचन व श्रद्धांजलीचे आयोजन

**निघोज : प्रतिनिधी**



**जिल्हा सहकारी बँकेचे तसेच जी.एस. महानगर बँकेचे माजी अध्यक्ष अॅड. उदय गुलाबराव शेळके यांचे रविवार दि.११ रोजी पिंपरी जलसेन येथे प्रथम पुण्यस्मरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला असल्याची माहिती जी.एस. महानगर बँकेच्या अध्यक्षा सुमनाताई शेळके तसेच जी.एस.महानगर बँक व जिल्हा सहकारी बँकेच्या संचालिका गीतांजली शेळके यांनी दिली.**

सकाळी ७ ते ९ पुजा विधी, सकाळी १० ते १२ संभाजी महाराज दरोडे यांचे प्रवचन तसेच त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती शेळके परिवार तसेच जी. एस.महानगर बँक परिवार यांनी दिली आहे.

सहकार चळवळीतील एक उदयोन्मुख नेतृत्व म्हणून अॅड. उदय शेळके यांचा नावलौकिक झाला होता. मात्र दिर्घ आजाराने त्यांचे एक वर्षापूर्वी निधन झाले. जी.एस.महानगर बँकेचे संस्थापक अध्यक्ष सॉलिसिटर गुलाबराव शेळके यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनखाली त्यांनी सहकार चळवळीत काम करताना जी.एस.महानगर बँकेचे संचालक तसेच जिल्हा सहकारी बँकेचे संचालक म्हणून अभ्यासू वृत्तीने कार्यरत राहात जवळपास पंधरा ते वीस वर्षे सहकार चळवळीला पाठबळ देऊन शेतकरी, उद्योजक,व्यवसायीक व सर्वसामान्य जनतेच्या आर्थिक समृद्धीसाठी मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे. तसेच जी. एस.महानगर बँक व जिल्हा सहकारी बँकेचे चेअरमन म्हणून कार्यरत असताना या दोन्ही बँकेच्या विकासासाठी त्यांनी मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे.

पारनेर तालुक्यातील जनतेच्या तसेच मुंबई स्थायिक तालुक्यातील जनतेच्या प्रश्नांसाठी विकासाभिमुख कामांना पाठबळ देणारे एक युवा नेतृत्व म्हणून अॅड. उदय शेळके यांचा नावलौकिक होता. जिल्हा सहकारी बँकेचे चेअरमन म्हणून त्यांनी पदभार स्वीकारल्यानंतर एक ते दिड वर्षात सहकारी बँकेत आधुनिक तंत्रज्ञान विकसित करीत तसेच बँकेच्या अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देऊन मोठ्या प्रमाणात बँक विकासासाठी मोठे प्रयत्न केले होते. अॅड. शेळके यांच्या निधनामुळे सहकार चळवळीला मोठा धक्का बसला मात्र शेळके परिवारातील सदस्यांनी जी. एस.महानगर बँक व जिल्हा सहकारी बँकेची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळीत जी. एस. महानगर बँकेचे संस्थापक अध्यक्ष सॉलिसिटर गुलाबराव शेळके व अॅड. उदय शेळके यांची उणीव मोठ्या प्रमाणात भरुन काढीत सर्वसामान्य जनतेला पाठबळ देण्याचे काम केले आहे.

पुण्यस्मरण निमित्ताने पुजा विधी, प्रवचन तसेच श्रद्धांजली हा कार्यक्रम होणार असून जनतेने या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन पारनेर तालुक्यातील शेळके परिवारावरील प्रेम करणारी जनता, जी.एस.महानगर बँक परिवार व पिंपरी जलसेन ग्रामस्थ यांनी केले आहे.

# गारपीटग्रस्त शेतकरी नुकसान भरपाईपासून वंचितच !

## तहसील कार्यालयावर ठिय्या आंदोलनाचा इशारा

**पारनेर : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील कांद्याचे आगार असलेल्या पानोली, वडूले, सिद्धेश्वरवाडी, सांगवी सूर्या, गांजी भोयरे आणि जवळा येथील शेकडो शेतकऱ्यांना तब्बल दोन महिन्यापूर्वी शासनाने घोषित केलेले गारपीटीच्या नुकसानीचे अनुदान अद्याप दिलेले नाही. यामुळे तहसील कार्यालयावर ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.**

दोन महिन्यापूर्वी पानोली वडूले परिसरातील चार पाच गावामध्ये मोठया प्रमाणात गारपीट झाली होती. यामुळे तब्बल चार हजार एकर क्षेत्रावरील पिकांचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाले होते. विशेषतः कांद्याचे मोठे नुकसान झाले. शासनाने पंचनामे करून शेतकऱ्यांना एकरी १० हजार अशी तुटपुंजी नुकसान भरपाई जाहीर केली. मात्र काही शेतकऱ्यांना तातडीने पैसे दिले परंतु अद्यापही



अनेक शेतकऱ्यांना वेगवेगळ्या त्रुटी सांगून अजूनपर्यंत नुकसान भरपाई दिलेली नाही. याबाबत तहसील कार्यालयात चौकशी केली असता सर्व्हर बंद होते अशी कारणे सांगितली जातात.

येत्या १५ दिवसात लोकसभेची आचारसंहिता लागण्याची शक्यता असून तसे झाल्यावर ही नुकसान भरपाई मिळणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी तहसील कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते नारायणराव गायकवाड , संतोष खोडदे, अंकुश गायकवाड, बी. ए. भगत, यांनी दिला आहे.

# वारंवार खंडीत होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे सोबलेवाडीकर त्रस्त

## संबंधित अधिकाऱ्यांचे मात्र उडवा उडवीचे उत्तरे

**सोबलेवाडी : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील सोबलेवाडी येथील खनवस्ती परीसरातील वीज ग्राहकांसाठी रितसर महावितरणचे कोटेशन भरून स्वतंत्र रोहित्र बसविण्यात आले आहे. परंतु कान्हूर पठार रोड लगत वीज महामंडळाचे ट्रान्सफार्मर असुन त्या वरती दोन फिडर आहेत. एक फिडर हाकेच्या अंतरावर तर दुसरा फिडर दिड ते दोन किलो मिटर अंतरावर आहे. त्या फिडरवर सोबलेवाडी परीसरातील नागरीक अवैध आकडे टाकून वीज चोरी करत असल्याने खनवस्ती परिसरातील हजारो रुपयांचा कायम स्वरुपी वीज भरणा करणारे ग्राहक आहेत. असे असताना देखील सकाळ व संध्याकाळ या रोहित्रावरून वारंवार खंडीत वीज पुरवठा होत असल्याने नागरीक त्रस्त झाले आहेत.**



या समस्याबाबत पारनेर टाऊन शाखेतील संबंधित अधिकारी यांना अवगत केले तरी कायमच उडवा उडवीची उत्तरे देऊन कायम स्वरुपी वीज भरणा करणाऱ्या ग्राहकांची बोळवण करण असल्याचा प्रकार घडत आहे.

सविस्तर माहिती अशी की, पारनेर तालुक्यातील सोबलवाडी येथील खनवस्ती परीसरातील नागरिकांना घरगुती वीज पुरवठा वारंवार खंडित होत असल्याने तेथील नागरीक मानसिक दृष्ट्या त्रस्त झाले आहेत. या गेली महिनाभरापासून पारनेर येथील महावितरण कंपनीचे अधिकारी यांना लेखी व तोंडी माहिती देऊन सुद्धा वीज ग्राहक यांना फक्त उडवा उडवीची उत्तरे देऊन त्याची बोळवण करण्याचे काम करत आहेत. त्या मुळे उन्हाळ्याचे उकाड्यात लोकांचे अतोनात हाल होत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण तयार होत आहे.

एक ते दोन किलोमीटरवर असलेल्या फिडर वर परिसरातील बहुतांश नागरिकांनी आकडे टाकल्याने वीज चोरी केली जात असल्याने खनवस्ती येथील रोहित्र वर ताण पडून वीज पुरवठा वारंवार खंडित होत आहे. त्या मुळे कायम स्वरुपी वीज भरणा करणाऱ्या ग्राहकांना नाहक या वीज चोरी मुळे विजेच्या लपंडवाचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे सोबलेवाडी परिसर केबल टाकून आकडे मुक्त करण्याची मागणी कायम स्वरुपी हजारो रुपये वीज बिल भरणा करणारे ग्राहक करत आहेत.

**या परिसरातील अवैध आकडे काढण्याचा प्रयत्न केला असता या परिसरातील नागरिक महिलांना पुढे करत असल्याने वाद निर्माण होत आहे.त्यामुळे आकडे बहादरांवर कारवाई करणे शक्य होत नाही. या बाबत आम्ही वरिष्ठांना अवगत केले आहे.**

**अजय बास्निवाल, सहाय्यक अभियंता.**

# श्रमसंस्कार शिबिर समाजाप्रती आत्मभान निर्माण करते

## प्राचार्य डॉ. शरद पारखे यांचे मत

**निघोज : प्रतिनिधी**

**राष्ट्रीय सेवा योजना समाजाप्रती आपली असणारी कर्तव्य जोपासताना समाजाभिमुख होऊन कार्यरत असतो. याच राष्ट्रीय सेवा योजनेच्या हिवाळी संस्कार शिबिरांच्या माध्यमातून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये श्रमसंस्कार रुजतात व त्यातूनच त्यांच्यामध्ये आत्मभान निर्माण होते, असे प्रतिपादन अळकुटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद पारखे यांनी केले.**

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील, प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अळकुटी महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचा सात दिवसीय निवासी शिबीर म्हस्केवाडत सुरू आहे. या श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन सरपंच आशा पानमंद यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना सरपंच पानमंद म्हणाल्या की, महाविद्यालयीन तरुणांमध्ये एक नवीन प्रकारची ऊर्जा असते. त्या ऊर्जेस अशा प्रकारच्या शिबिरांचे पाठबळ मिळाले तर निश्चितच आपला भारत देश अग्रेषित होऊन विकसित राष्ट्रांच्या पंक्तीत जाऊन बसेल यात शंका नाही.



यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद पारखे यांनी अध्यक्षस्थानाहून बोलताना राष्ट्रीय सेवा योजनेचा इतिहास कथन केला.या श्रमसंस्कार शिबिरासाठी एकूण ७५ विद्यार्थी स्वयंसेवक व प्राध्यापकांचा समावेश आहे.

या शिबिराप्रसंगी पाडळी आळे गावचे माजी सरपंच भाऊसाहेब डेरे, विघ्नहर पतसंस्था चेअरमन सुदाम म्हस्के, व्हाईस चेअरमन सुनील पानमंद, विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन शिवाजी म्हस्के, श्री गणेश देवस्थान ट्रस्टचे उपाध्यक्ष बाळासाहेब म्हस्के, सखाराम गोर्डे, माधवशेठ गोर्डे, राजू गोर्डे, विकास गोर्डे आदी म्हस्केवाडी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.
या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सह कार्यक्रम अधिकारी प्रा. अर्जुन चाटे, प्रा. सुप्रिया पारखे, प्रा.पोपट सुंबरे यांनी विशेष मेहनत घेतली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. दशरथ पानमंद यांनी केले.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com